विश्वंभर शिक्षण संस्था, नागपूर द्वारा संचलीत १) लिलाताई देशमुख मतिमंद मुलींचे शिक्षण व प्रशिक्षण व पुर्नवसन केंद्र, नागपूर व २) इंदूताई ढोबळे वर्कशॉप ॲन्ड रिहॅब्लिटेशन सेंटर फॉर मेंटली चॅलेंज्ड गर्ल्स हुडकेश्वर, नागपूर या मतिमंद मुलींच्या कायम विनाअनुदान तत्वावरील शाळेला व कर्मशाळेला विशेष बाब म्हणून अनुदान तत्वावर मान्यता प्रदान करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक एमआयएस २०१८/प्र.क्र.१०९/अ.क.१
मंत्रालय, मुंबई -४०००३२.
दिनांक : ३ जुलै, २०१९.

<u>वाचा</u> : १) शासन निर्णय सामाजिक न्याय विभाग क्र.ईडीडी २००१/प्र.क्र.५०२/सुधार-२, दि.१९.७.२००३ व समक्रमांकाच शासन पुरकपत्र दि.४.१२.२००३.

२) शासन निर्णय सामाजिक न्याय विभाग क्र.ईडीडी २००३/प्र.क्र.३४०/भाग-२/सुधार-२, दि.१८.८.२००४ व दि.३०.१.२००६.

३) आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांचे क्र.अकआ/प्र-४/विश्वंभर/नापगूर/विशेष बाब/ अनु.मान्यता/ २०१८-१९/२९५१, दि.१३.७.२०१८.

प्रस्तावना :-

विश्वंभर शिक्षण संस्था, नागपूर द्वारा संचलीत १) लिलाताई देशमुख मतिमंद मुलींचे शिक्षण व प्रशिक्षण व पुर्नवसन केंद्र, नागपूर व २) इंदूताई ढोबळे वर्कशॉप ॲन्ड रिहॅब्लिटेशन सेंटर फॉर मेंटली चॅलेंज्ड गर्ल्स हुडकेश्वर, नागपूर या मतिमंद मुलींच्या कायम विनाअनुदान तत्वावरील शाळेला व कर्मशाळेला विशेष बाब म्हणून अनुदान तत्वावर मान्यता प्रदान करण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

विश्वंभर शिक्षण संस्था, नागपूर द्वारा संचलीत १) लिलाताई देशमुख मतिमंद मुलींचे शिक्षण व प्रशिक्षण व पुर्नवसन केंद्र, नागपूर या मतीमंद मुलींच्या शाळेला ४० निवासी व २५ अनिवासी अशी एकूण ६५ कायम विना अनुदानीत विद्यार्थी संख्येस व २) इंदूताई ढोबळे वर्कशॉप ॲन्ड रिहॅब्लिटेशन सेंटर फॉर मेंटली चॅलेंज्ड गर्ल्स हुडकेश्वर, नागपूर या मतिमंद मुलींच्या कर्मशाळेस ४० निवासी व २० अनिवासी अशी एकूण ६० कायम विनाअनुदानीत विद्यार्थी संख्येस आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांनी अपंग व्यक्ती अधिनियम, १९९५ अन्वये नोंदणी प्रमाणपत्र क्र.ए-०३०, दि.११.८.२००६ व नोंदणी प्रमाणपत्र क्र.ए-०५७८, दि.३०.३.२०१० रोजी कायम विनाअनुदान तत्वावर शाळेस /कर्मशाळेस मान्यता प्रदान करण्यात आली असून, सदरहू शाळेस/कर्मशाळेस एक विशेष बाब म्हणून अनुदान तत्वावर खालील अटीं व शर्तीच्या अधिन राहून या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत :-

१) सदर शाळेस /कर्मशाळेस शासनाने वेळेवेळी निश्चित करतील अशा अटी व शर्ती लागू राहतील.

२) सदर शाळेस/कर्मशाळेस अनुदान तत्वावर मान्यता प्रदान करण्यात येत असून, याअनुषंगाने वेतनेत्तर अनुदान व पदनिर्मितीबाबत वित्त विभाग व उच्च स्तरीय सचिव समितीच्या मान्यतेच्या अटींच्या अधीन राहून सदरहू मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

३) सदर शाळेस/कर्मशाळेस सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दि.८.४.२०१५ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयामधील प्रपत्र-ब व प्रपत्र-क मध्ये विहीत केलेल्या अटी व शर्ती लागू राहतील.

४) सदर अपंगांच्या विशेष शाळा/कर्मशाळांना केंद्र शासन स्थानिक स्वराज्य संस्थांकडून किंवा इतर संस्थांकडून नियमित अनुदान मिळत आहे असे निदर्शनास आल्यास सदर संस्था राज्य शासनाचे अनुदान मिळण्यास अपात्र ठरेल.

५) शासनाने अनुदान तत्वावर आणण्याकरीता वेळेवेळी विहित केलेल्या अटी व शर्ती आणि कार्यपध्दतीचे पालन झालेले नाही असे आढळून आल्यास त्या संस्थेची मान्यता रद्द करण्यात येईल.

६) सदर शाळेस ४० निवासी व २५ अनिवासी व कर्मशाळेस ४० निवासी व २० अनिवासी विद्यार्थी संख्येवर अनुदान तत्वावर मान्यता प्रदान करण्यात येत असून दि.१८.८.२००४ च्या आकृतीबंधानुसार आवश्यक असणारा कर्मचारीवृदांबाबतचा प्रस्ताव उच्च स्तरीय सचिव समितीच्या मान्यतेसाठी सादर करावा. सदर मान्यतेशिवाय सदर पदांना पदमान्यता देण्यात येऊ नये.

७) मा.न्यायालयात दाखल असलेल्या रिट याचिका क्र.६९०/२०१३ डॉ.बाबासाहेब परांजपे प्रतिष्ठान आंबेजोगाई विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर या प्रकरणी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.३.९.२०१३ अन्वये शासनाने अपंगांच्या विशेष शाळा/कार्यशाळांच्या अनुदानाबाबत धोरण ठरविण्याचे आदेश दिले आहेत. सदर धोरणातील निकषांच्या अधिन राहून सदर शाळेस अनुदान तत्वावर मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

८) विश्वंभर शिक्षण संस्था, नागपूर द्वारा संचलीत १) लिलाताई देशमुख मतिमंद मुलींचे शिक्षण व प्रशिक्षण व पुर्नवसन केंद्र, नागपूर व २) इंदूताई ढोबळे वर्कशॉप ॲन्ड रिहॅब्लिटेशन सेंटर फॉर मेंटली चॅलेंज्ड गर्ल्स हुडकेश्वर, नागपूर या मतिमंद मुलींच्या शाळा/कर्मशाळा असून त्या शाळेस व कर्मशाळेस “अ” श्रेणी प्राप्त असल्याने मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या मान्यतेने “विशेष बाब” म्हणून सदर शाळेला/कर्मशाळेला मान्यता देण्यात येत आहे. परंतु यापुढे इतर अपंगांच्या शाळां/कर्मशाळांच्या मान्यतेसाठी ही बाब लागू असणार नाही.

सदर शासन निर्णय हा मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचे संकेतांक २०१९०७०६१६०९४०९८२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DINGLE DINESH RAMCHANDRA

Digitally signed by DINGLE DINESH RAMCHANDRA
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=8612f2011cf8cde3b074d561cd711c17c6c3fd836467a8648a8d21dc84bc01be, postalCode=400032, street=151 ANNEX,1ST FLOOR,MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=fc344849650ce07c3f9adc7e2cd4976b2852065e2acd65f7cee1828c10091458, ou=SOCIAL JUSTICE AND SPECIAL JUSTICE DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=DINGLE DINESH RAMCHANDRA
Date: 2019.07.06 16:19:27 +05'30'

(दि. रा. डिंगळे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
२) मा.मंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव.
३) मा.राज्यमंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव.
४) प्रधान सचिव (सा.न्या.) यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक.

५) आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
६) प्रादेशिक उप आयुक्त समाज कल्याण अधिकारी, नागपूर
७) जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर
८) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरीक्षा) महाराष्ट्र -१/२, मुंबई/नागपूर
९) जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर
१०) अध्यक्ष/सचिव, विश्वंभर शिक्षण संस्था, नागपूर द्वारा संचलीत लिलाताई देशमुख मतिमंद मुलींचे शिक्षण व प्रशिक्षण व पुर्नवसन केंद्र, नागपूर.
११) अध्यक्ष/सचिव, विश्वंभर शिक्षण संस्था, नागपूर द्वारा संचलीत इंदूताई ढोबळे वर्कशॉप ॲन्ड रिहॅब्लिटेशन सेंटर फॉर मेंटली चॅलेंज्ड गर्ल्स हुडकेश्वर, नागपूर
१२) निवडनस्ती, अपंग कल्याण-१

******